मी जाता राहील काळ काय, जन पळभर म्हणतील हाय हाय. ही कवितेची ओळ हल्ली ह्यांच्या तोंडी फार असे. ८९ वर्षे पूर्ण होऊन ९० वे वर्ष लागले. मुलगा सून नात भुवनेश्वरला बोलवत असून सुध्दा गेलो नाही. कारण नातू (मुलीचा मुलगा) आमच्याकडे रहात असे तो ब्रिटिश महेंद्र ला काम (सर्व्हिस) करायचा. तेव्हा आम्ही भुवनेश्वरला गेलो तर तो एकटा कुठे कसा राहील, काय खाईल ही चिंता त्यांना होती केवळ नातवासाठी पुण्याला राहिलो. तो दोन वर्षे आमच्या जवळ रहात होता. त्यामुळे नाही म्हटले तरी लळा लागलाच होता थोडा. दुसरा नातू तर ४ वर्षे राहिला (मुलाचा मुलगा). पण बी ई झाल्यावर लगेच अमेरिकेला गेला. त्याचे आई वडील ऑफिसर आहेत व भुवनेश्वराला रहातात म्हणून आम्ही लगेचच म्हणजे ऑगस्ट मध्यें भुवनेश्वरला यावे असे मुलाचे मत होते. पण नातीचे लग्न होते. हे कुंडली पहात होते. अत्यंत विद्वान व ज्योतिषतज्ञ माणूस म्हणून त्यांची प्रसिद्धी आजूबाजूला पसरली होती. तिचे लग्न ठरले लग्न झाले २८ नोव्हेंबरला. आता संक्रांतीनंतर भुवनेश्वरला कायमचे जाऊ असे ठरले. २६ जानेवारीला मुलगा (सतिश) आला व त्याच वेळी हे नेमके आजारी पडले. छाया (दोन नंबरची मुलगी) डॉक्टर, तिला लगेच बोलाविले. त्यांची अतिशय लाडकी व काळजी करणारी म्हणून तिला बोलावून घेतले. आमच्या घरांत तिनें मला व ह्यांना वाचविले होते. ह्यांचे जळगावला ऑपरेशन होते हर्णियाचे. दोन्ही हर्णियांचे ऑपरेशन करावे लागले. दुसरे ऑपरेशन ईमर्जन्सी होते, रात्री १२ वाजता. ऑपरेशन जळगावला झाले त्यावेळी डॉक्टरीण बाई स्वतः हजर होत्या. आई ग, दादाना गॅंगरिन होईल अशी भीती आहे, आता मात्र खरे नाही. देवावर हवाला ठेवून ती रामरक्षा व मी हनुमान चालिसा म्हणते होतो. त्यातून ते पूर्णपणे बरे झाले. पुण्याला स्थायिक व्हायचा निर्णय झाला तेव्हा नातू (दोन्ही) येतील ही अपेक्षाच नव्हती. पण मुलाचा मुलगा (अनुष्टुभ) आधी आला. त्याने इलेक्ट्रॉनिक्स हा विषय घेतला. दुसरा नातू (मुलीचा मुलगा) होस्टेलवर राहायला लागला. त्यानें कॉम्युटर हा विषय घेतला. २ वर्षे होस्टेलवर राहून त्यानंतर माझ्याकडे औधलाच राहू लागला.

---

## देवरूख मधले बालपण

दोन्ही बहिणी एक वर्गात. लोकांना खूपच आश्चर्य वाटायचे. मोठी ताई माझ्यापेक्षां या वर्षानी मोठी. पण आईच्या आजारपणामुळे तिची शाळा उशीरां सुरु झाली. वडील (दादा) त्यावेळी मुंबईला राहून शिकलेले. त्यामुळे मुलांच्या शाळेत मुलीना कसे घातले हा पण लोकांच्या चर्चेचा विषय. गांवाचे नाव देवरुख. सर्व दशग्रंथी ब्राह्मण रहात असत. वर मुलींना मुलांच्या दोन तृतीयांश फी ठेवली तर माझ्या दोन्ही मुलींना इंग्लिश शाळेत घालीन असे त्यानी त्यावेळच्या अध्यक्षांना सागितले. ते कबूल झाले. गांव जरी दशग्रंथी, कोकणस्थ ब्राह्मणाचा असला तरी भरपूर कऱ्हाडे तिथे रहायचे. आता देशस्थ कऱ्हाडे कोकणस्थ असा फरक जरी फार जाणवत नाही तरी त्यावेळी तो खूपच वाटे. कारण मी देशस्थ माणसाशी लग्न केले होते. देसाई, आठले, सप्रे, पंडीत, पित्रे पेंढारकर वगैरे सर्व मडळी होती शाळेच्या बोर्डावर. मुलांच्या शाळेत जातो म्हणून पुराणाहून येणा-या बायका आम्हांला बघून थुकायच्या व फिदीफिदी हसायच्या. पुराण सुटायची वेळ शाळा सुटण्याची वेळ एकच असे. मला मात्र त्या बायकांचा राग यायचा. मी पण त्यांच्यावर कांही शेरे मारायची. पण आईला हे आवडत नसे. ती म्हणायची लोक बोलणार तुम्ही त्याच्याकडे दुर्लक्ष करा. आमच्या नव्या घरात तू उद्यापासून अभ्यासाला जा असे वडिलांनी सागताच मी तर अवाक् झाले कारण आजीचे काका तिथे रहात असत. माझे वडील वकील होते. १९२३ सली झेवियर कॉलेज मधून त्यांनी डिग्री घेतली व महाराष्ट्रांत वकीलीची सनद मिळविली. त्यामुळे रत्नागिरी जिल्ह्यांतील देवरूखला त्यांची वकीली सुरु झाली. त्यानी सासऱ्याचे घर विकत घेतले. मी शाळेंत जात होते. आमच्या वेळीं ६ वर्षे पूर्ण झाल्याशिवाय शाळेत घेत नसत. घरीच २ ते ३० पर्यंत लेख, पाढे, पावकी, निमकी, पाऊणकी, दिडकी अडीचकी व औटकी सर्व पाठ केले होत.

त्यावेळी बिगारी यत्ता होती त्यांतच प्रवेश मिळे. त्यानंतर पहिली यत्ता. दुस-या यत्तेतील गोष्ट अजून आठवते. पाटी दप्तर जमिनीवर ठेवून दहा मिनिटांच्या पाणी पिण्याच्या सुटीचा लाभ मिळे तो घेतला. दप्तर ठेवून पाणी पिण्याला गेले आणि कोणी तरी दप्तरावर पाय दिला. कोरी नवी पाटी फुटली. त्यावेळी बसायला गोणपाट असे. जागा आधी धरून ठेवायची. बाईंना सांगितले पाटी फुटली. कोणी कबूल होईना. घरी गेले. पाटीचे तीन तुकडे झाले होते. २ ते २० पंयत पाढे बाईनी पाटीवर लिहून आणायला सांगितले होते. मोठा कळपा जो होता त्यावर पाढे लिहिले. शाळेत गेले. बाईनी सर्व पाट्या ठेवा, मी प्रार्थना झाली की तपासते असे म्हटले. माझा कळपा पाहून बाईंचे डोके भडकले. हा कळपा कुणाचा (कळपा- पाटीची तुकडा मोठा) मी म्हटले माझा. उद्या जर हा कळपा शाळेत आणशील तर तो तुझ्या डोक्यात घालून खोक पाडीन अशी धमकी बाईनी दिली. लहानपणी मला पटकन् रडू येत असे. बाईंची धमकी ऐकून मी रडायला लागले.

दप्तर भरून घरी निघाले. घर जवळच होते. बाईनी मोलकरणीला हांक मारून हिला घरी पोचवून ये असे सांगितले. मी रडत घरी आले. झाले, वडील नेमके आंघोळीसाठी येत होते. हिला रडायला काय झाले ते म्हणाले. मोलकरणीने सांगितले पाटी फुटली म्हणून बाई रागावल्या ही रडायला लागली म्हणून घरी आणली. दोनच दिवसा पूर्वी नवीन पाटी वडिलानी विकत घेतली होती. वडिल वकील होते हे सांगितले आहेच. ते म्हणाले बाईना सांग हा कळप डोक्यांत हाणून खोक पाडाच. मग काय होते ते पहा उधा हीच पाटी (कळप) न्यायची. बाईना ठणकावून सांगायचे. मी वडीलांच्या म्हणण्याप्रमाने कळपा घेऊन गेले व बाईनां वडीलांचा निरोप सांगितला. बाई ज्या गप्प झाल्या त्या त्यानंतर मला एकदांही रागवल्या नाहीत. आमच्या वेळी एकाच बाईकडे २-३ क्लास असायचे

---

देवरूखचे विधामंदिर

देवरूख हे गावच मुळी रत्नागरी जिल्हयांत उत्तम हवा पाण्यासाठी प्रसिध्द होते. दापोली हे सुध्दां त्यासाठीच प्रसिध्द होते. तिथली रमणीय शाळा एल् आकाराची. विस्तीर्ण माळावर विसावलेली. गांवापासून दूर. अतिसुंदर दृश्य शाळेतून दिसायचे. कोणत्याही वर्गाच्या दारात उभे राहिले तर दुरून दिसणारे आपल्याला खुणावणारे डोंगर मोंड माळरान. त्या जागेवर शेतीभाती काहीच नव्हती शाळेचा वेळ कसा काय संपून गेला कळलंच नाही. पहिली ते तिसरी हे इंग्लिशचे वर्ग असत. ज्याना इंग्लिश शिकायचे नसेल ते ५ वी ते ७ वी (व्हः फा ) करून मग शिक्षकाचा डिप्लोमा करत व प्रायमरी शाळांतून नौकरी धरत. ४ थी नंतर इंग्लिश पहीली दुसरी व तिसरी असे तीन वर्ग असत. जी मुले ७ वी पास होत ती एका वर्षात ३ यत्तांचा अभ्यास करून एकदम ८वीत (आतांच्या इंग्लिश चौथीत) येत. फक्त इंग्लिशच त्याना करावे लागे असे वाटते. ११ वी मॅट्रिक त्यावेळी परिक्षा कंपलसरी असे. त्यांत जे पास होतील त्यानांच परिक्षेचा फॉर्म मिळत असे. शाळेचा रिझल्ट त्यामुळे सेंटपर्सेट लागायचा. फॉर्म भरला की शाळा संपली. मग फारच दुःख होई शाळेचे दिवस भरकन संपले ही खंत टोचत राही. शाळेत गणपति उत्सव मात्र दरवर्षी मोट्या प्रमाणात होई. त्यावेळी भाषण कविता उत्स्फूर्त भाषण वगैरेंच्या चढाओढी होत. त्यांत अर्थात् पहिल्या नबंराना बक्षिस असे. खेळांच्या चढाओढी होत. मुलीसाठी चमचा लिंबू सुई पटकन ओवणे धावणे लंगडी तीन पायानी चालणे वगैरे खेळ असायचे. मुख्य कार्यक्रम आमच्या वेळी सुरू केला तो म्हणजे नाटक. खिरापत खोबऱ्याची असे. प्रत्येक मुलीने पाळी पाळीने खोबरं (सुखे) किसायचे. ब्राह्मण पूजेला असायचा. मूर्तिची स्थापना वाजत गाजत ढोल ताशे लेझीम हयांच्यात होई. सर्व मुले मुली हजर. त्या वेळी सुटी असे. पण जर हजेरी घेतली असती तर झाडून सगळीजणें हजर असल्याचें दृश्यदिसले असते. दिवशी  विसर्जन उतमोत्तम साड्या आणून मुलीनी त्याची आरास केलेली असायची. विसर्जनाच्या वेळी सर्व आरास काढून टाकलेली भकास जागा दिसायची. खूपच रडायला यायचे. सर्व हॉल खाली असायचा. मुलीपण विसर्जनाच्या वेळी नदीवर जायच्या. विसर्जनाहून आल्यावर मी आईला विचारलेला प्रश्न मला अजून आठवतो. आपण इतकी सुंदर मूर्ति आणतो. देखावे उत्सव साजरे करतो. मग  मूर्तीचे विसर्जन कां करतो

आईचे उत्तर अग, हिंदू धर्माप्रमाणें सर्वसंगपरित्याग कल्पना आपल्यांत रुजावी दरवर्षी उत्तम मूर्ति करणारे कारागिर व्हावेत. जुन्या मूर्ति ठेवायच्या कुठें हा प्रश्न पण येणारच ना. आणी कितीही  सुंदर मोहक अशा वस्तुचा त्याग एका क्षणांत करणे हाच आपला धर्म असला पाहिजे. आईचे उत्तर आजही लागू होते. नाहीतर सत्तावन वर्षीची साथ सोडून कांही न बोलतां सांगता हे झोपेत निघून गेलेच नसते.

---

कसे सोडून गेलात निमूटपणे कोणालाही न सांगता. एवढी ५७ वर्षीची संगत सोबत टाकून गेलात. जरा तरी विचार केलात का आपल्यामागे कुणाचा आधार आहे मला. ५७ वर्षांचा काळ इतिहासाच्या दृष्टिने अल्प असेल पण लग्नाच्या बाबतीत? दोन जीव एकत्र येतात भांडतात रुसतात परत एक होतात. आतां कोणाला सांगू की तुम्ही मोठे आहात, तुमचा अधिकार आहेच कुणालाही सांगण्याचा व बोलण्याचा. सगळ्या संसाराचा भार आता माझ्यावर येणार. होत्याच नव्हते असें एका क्षणांत घडते का? माझे तर ऐकल्यापासून पायच गेले. शक्ति गळल्यासारखी झाली. उठतां येईना. त्यावेळेचं वर्णन कसं करुं. मोठी मुलगी लीना जवळ होती म्हणून बरे. तिने सगळें मॅनेज केले भराभर फोन केले. मोठी मुलगी -- लहानपणांपासून मोठीच राहिली. कधी भावल्यानी खेळली नाही की भातुकलीत रमली नाही. बुद्धीची झेप मात्र मोठी. एकदम ३रीत गेली. ११वी मॅट्रिक झाल्यावर दोन्ही भावंडाना गणित फिजिक्स पासून मदत केली. माझ्या मुलाना अभ्यास करा असे आम्ही म्हटलेंच नाही. नाही तर आताची मुले। पहिल्या मुली नंतर दुसरी मुलगी २ वर्षांनी झाली तेव्हा मात्र आईवडीलांकडे बाळंतपणा साठी गेले नवव्या महिन्याचे २ दिवसच झाले होते. मुंबई ते देवरूख बसचा प्रवास होता. रस्ते काही तेव्हा डांबरी नव्हते. पण एकटीनेच प्रवास केला वडीलानी ४ थ्या दिवशी विचारले अजून अवकाश आहे ना। मी हो

म्हटले. मग आज माझ्या मित्रांसाठी ओल्या पावटयाची उसळ नारळाची चटणी व ४ दुधाच्या दशम्या करून ठेव. मी बर म्हटले. पण माझ्या चेहऱ्याकडे पाहून वडीलानां कशाचा तरी बोध झाला असावा. पण बोलले नाहीत. वडील १ च्या सुमारास कोर्टात गेले. आमची दोन घरे होती. तो एक वेगळाच इतिहास आहे. वर दाराला कुलूप लावून वडील कोर्टात गेले. आईच माझ्या सोवळ ओवळ फार. सर्व सामसूम झाल्यावर विहीरींतून पाणी काढून ती अंगावर ओतायची. ओलेल्यानी रस्त्यावर पाणी शिंपत ती देऊळा पर्यंत यायची. मग सर्व पूजेची तयारी आहे हे पाहून धूतवस्त्र (सोळयांतले) नेसून पूजा करायची त्यानंतर जेवण. चुलीवरचा गरम भात व वरण आणि पोळी भाजी असा थाट असे. त्यावेळी आमच्याकडे एक भिकारीण यायची. तिला पण गरम भात व वरण असे मिळायचे. रेशनचे दिवस असून सुध्दां. ती आली. मी बाहेर झोपाळयावर बसले नी पोटात कळा यायला एकच गांठ पडली. वकीलणी, पोरगी बघ कशी करतेय. कळा येताहेत तू पटकन उरक. असे ती आईला म्हणाली. तू जेव व सावकाश ये अस मी आईला सांगितले पण आईचेच ह्रदय ते. ती पटकन उठली भरल्या पानावरून. गड्याला हांक मारून खोली रिकामी करायला सांगितले. पण हा गडी होता कुठे। तो सगळे आटोपल्यावर नदीवर जाऊन सर्व आटपून आंघोळ करून यायचा. मग दुपारी आमच्याकडेच जेवायला असे. आईने शेजारणीला हांक मारून त्यांची पुतणी घरात आहे का विचारले कारण ती शाळेत जात नसे. शाळेची वेळ असल्याने सर्वजण शाळेत. माझ्या तीन बहीणी पण. शालूला सुईणीकडे बोलवायला पाठविले. गडी आला, खोली स्वच्छ केली. भाताची (साळीची) पोती ठेवली होती ती काढली. नंतर बाज आणली शेजाऱ्यांचीच. तो पर्यंत सुईण पण आली. नंतर ४ च्या सुमारास माझी सुटका झाली. घड्याळांत वेळ पहा असे माझ्या बहिणींना सांगितले होते. तो पर्यंत त्या शाळेंतून परतल्या होत्या. त्यानी वेळ लिहुन ठेवली. झाले. ही बातमी वडीलांचे मित्र होते त्यांनी त्यानां कोर्टात दिली. वडील उत्तम ज्योतिषी होते. हे पण आल्यावर त्यांनी पत्रिकेसाठी वेळ विचारली ४ वाजले होते असे बहिणीने सांगताच ते म्हणाले घड्याळ १० मिनिंट पुढे आहे. ६ मिनिटांत लग्न बदलते. वसंत लाडोबा म्हापणकर तेव्हा भविष्य लिहीत असत. गरोदर स्त्रियानां कन्यारत्न प्राप्त होईल. वडीलांची नोकरी जाईल. जीवनात भरपूर चढ उत्तार होईल. बुध्दीवान कन्यारत्न असेल हे भविष्य म्हापणकरांचे. वेळात फरक झाला. जन्मापासुन तिच्या कटकटी सुरू झाल्या. कैवल्यधाम मधे आम्ही होतो. यांना पीएचडी ची स्कॉलरशिप तिथूनच मिळाली होती, त्यांचा बॉण्ड होता. तुम्ही नोकरी सोडून जाऊ शकता. तुम्ही तरूण आहांत. तुम्हाला बॉण्ड मधून मुक्त करीत आहो हे शब्द आठवतात. छाया (दुसरी मुलगी) फक्त ३, ४ महिन्यांची होती त्यावेळी अनएम्लॉयमेंट भरपूर. १९५२ चा काळ होता. माझा भाऊ वकील, मेव्हणे प्रोफेसर, व हे असे तिघेही उच्चाशिक्षित लोक बेकार होते. मग नोकरीवा शोध सुरु. नाही म्हणायला डोक्यावर छप्पर होते. सासऱ्यांचा आधार होता. पीएचडी माणसाला शिक्षक म्हणून सुध्दां नोकरी मिळत नव्हती. त्यावेळी जर त्यांनी पुण्याला जाऊन नोकरीचा प्रयत्न केला असता तर कदाचित बस्तान बसले असते. पण दैवगति. विक्रमाला सुध्दां शनिच्या साडेसातीचा त्रास झाला. मग हयांच्यासारख्या सामान्य माणसाची काय कथा. व्यारा, खाडंवा व जबलपूर अशी आमची भ्रमंती घडली. खांडव्याला असताना मी बीए पास झाले नागपूर युनिव्हर्सिटीची. व मला मुलगा झाला. त्यावेळी त्याचे ज्योतिष असे होते -- ६ महिन्यांत लेक्चरर म्हणून कुठेतरी पित्याला नोकरी लागेल. ह्यांचा एक दोस्त होता त्याने मात्र जबलपूर ची जाहिरात पाठविली होती. ह्यानी अर्ज केला, ती नौकरी मिळाली व गाडी मार्गाला लागली. सासरे पण येऊन राहिले. घटस्फोटित नणंदेला नागपूरला दाईच्या ट्रेनिंगला पाठविले. त्यांच्या मुलीला मात्र मी माझ्या तीन मुलांबरोबर वाढविले. त्यांचा कोर्स पुरा झाला व त्यांना पांढरकवडयाला नोकरी लागली. जबलपूरला पगार अगदी कमी होता. पण भागत होते (कसबसे ) त्या दिवशी मी सहजच मागच्या दारी घरमालकांच्या सुनेबरोबर गप्पा मारत होते. इतक्यांत एक कुडबुड्या जोतिषि तिथे टपकला (बहुधा तेलंगी ब्राह्मण असावा). त्याला मराठी अवगत होते. माई तुझा हात बघतो. त्याने हात बघून भविष्य सांगितले. तुझ्या पतिला चांगली (पोस्ट) जागा मिळेल. वाहन ठेवशील. मुले शिकतील घर होईल वगैरे. हयानी मला विचारले की मी कोणाशी बोलत होते. मी आपली हयांची थट्टा केली - एक माणूस उच्चपदी होणार मोटरीतून फिरणार असे भविष्य कुडमुड्या ज्योतिषाने सांगितले आहे. दुसऱ्या दिवशी खरोखरच माझ्या दीरांचे पत्र आले. दरभंग्याला (बिहार) संस्कृतची जागा खाली आहे. मी अंमळनेर सोडणार नाही. तू नाहींतरी भरपूर गांवे पाहिलीस. इथे पण अर्ज कर, आपला मित्र तिथेच आहे. (शर्मा) साध्या कागदावर अर्ज कर, फॉर्म मागवून घे. दरभंग्याला अर्ज केला. अर्जानंतर जवळ जवळ ६ महिन्यानी इंटरव्ह्यूचा कॉल आला. वर्षानंतर पुन्हां बोलाविले सिलेक्शन झाले. त्यापूर्वी खूप डिस्कशन झाले.

---

दरभंग्याला अर्ज करायचा ठरला माझ्या एका मैत्रीणीनें किस्सा ऐकविला ती म्हणाली बिहार मध्यें शहाण्याने जाऊ नये. एकदा तिथे गुरांची साथ होती म्हणून तिच्या नवऱ्याला त्यावर उपाय योजना करण्यासाठीं बोलाविले होते. प्रिंसिपॉल सारख्या उच्च पदावर असलेल्या त्या माणसाचे प्राण ड्रायव्हरच्या प्रसंगावधानें वाचले. महू युनिव्हर्सिटीचे व्हेटर्नरी कॉलेजचे. ते प्रिंसिपॉल होते जबलपूरच्या व्हेटर्नरी कॉलेजला. काय झाले? त्यांच्यावर पाटण्यात विद्यार्थ्यानी पथराव केला. ते गृहरथ

पळत होते. जवळजवळ ६ फूट उंचीचे, शरीरयष्टी छान असलेले ते पळतात एवढे येणा-या बसवाल्याने पाहिले. पटकन बस थांबवून त्यानां आंत घेतले व बस जास्त वेगानें नेली म्हणून ते वाचले असे त्यांच्या बायकोने सांगितले. आपण बरे की आपले काम बरे. कुणाशीच संपर्क फार ठेवला नाही की झाले. दोन तीन जणांनी जबलपुर किती छान हे पटवून दिले. बिहारची सरकारची सर्व्हिस असल्यामुळें शिवाय ह्यांचे वय झालेले आहे हे लक्षांत घेऊन मी म्हटले आली तर नौकरी घ्यायची. कारण दुसऱ्यांकडे हाथ पसरणे यात किती कमीपणा असतो हे माझ्या एका दिरामुळे मला माहित होते. काहीतरी पेन्शन बसेल असा माझा अंदाज बरोबर ठरला. हे नौकरी वरून निवृत्त झाले त्यावेळी फॅमिली पेन्शन पण शास्त्रीजींमुळे सुरू झाली होती. हयांना नोकरी मिळाली सिलेक्शन झाले व बोलविणे आले त्यावेळी माझे सासरे जे आमच्याजवळ होते ते म्हणाले लगेच जॉईन हो. मी आजारी आहे पण तुम्ही परतायची घाई करू नये. त्यांना उत्तेजन दिले. दरभंग्याला गेले. तसे दरभंगा वाईट नाही असे पत्र आले. इकडे मला दिवस. सासरे म्हातारे. मुले लहान म्हणून हयांच्या बहिणीच्या नवऱ्याला बोलाविले ते आले. पण हिंदी येत नाही इंग्लिशचा पत्ता नाही कुठेच जाता येईना. मीच रिक्षाने जाणे येणे करू लागले. नंतर सासरे पण आजारी पडले. त्यांतच त्यांचा अंत झाला पण मरतांना पुतण्याने सर्व विधी पार पाडावे असे मला सांगून गेले होते. दरभंग्याला तार पाठवून हे येईपर्यंत पुष्कळ वेळ गेला असता म्हणून आताच सर्व उरकावे असे सर्व लोकांचे म्हणणे पडले. फक्त आमचे प्रिन्सिपॉल मात्र हयाच्या विरूध्द होते. ते येई पर्यंत पार्थिव राहू दे असा त्यांचा निर्णय. होय नाही करता त्यांना अग्नि वगैरे देऊन झाला व दुस-या दिवशी हे आले.

---------------------------------------------------------------------------

पूर्वीच्या लोकांचा दृष्टिकोन व आतांचा दृष्टिकोन हयांच्यात खूपच फरक. दुस-या बाळंतपणाच्या वेळी इकडेच ये म्हणजे मुलगाच होईल आईने सांगितले होते मुलगाच झाला पम एव्हाना वडिलांना पॅरॅलेसिस झालेला. वकीली चालेना. आईनी बाळंतपण केले. जास्त दिवस राहाता येईना. लौकरच लहान दोन्ही बहीणीना घेऊन मी खांडव्यासाठी परतले. मुलीला सोय-यांकडे ठेवून शिकवायचे नाही हे वडिलांचे स्पष्ट मत. तिचे शिक्षण पीएचडी आहे असे हयांचे भविष्य. सध्या मुलगा लहान आहे मी घेऊन जाते असे सांगून आणले. तिच्याहून मोठ्या असलेल्या बहीणीला मुबंईला भावाकडे पाठविले. मी, हे मुली व पुष्पा (बहीण) मुंब्राला उतरलो व सुधा त्याच बसने माहीमला गेली. घोटाळ्यांची मालिकाच जणु माझ्या आयुष्यांत होती. बहीणीला माहिमला सोडून आले खरी पण तिचे पत्र येई पर्यंत तिची काळजी करणे एवढेंच माझ्या हाती होते. एक महिना झाला तिचे पत्र नाही. मग सविस्तर पत्र आले. माहीमलाच त्यांची बस खराब झाली. पण ड्रायव्हर वडिलांच्या परिचयाचा होता व कंडक्टर पण आमच्या घरी येत असे. शिवाय त्यांना भाऊ कुठे रहातो ते माहीत होते. भावाने रात्री फोन करून बस डेपोतून माहिती काढली होती. बस खराब झाली त्यामुळे माहिमलाच जवळच्या हॉटेल मध्यें थांबली आहोत सकाळी बस ठीक झाल्यावर निघतो तुमच्या बहीणीची उत्तम काळजी (सर्व पॅसेंजराची ) घेतली आहे. उद्या बस स्टॅंडवर या असे कंडक्टरने सांगितले. भावाचा जीव भांडयात पडला.

तिच्याहून मोठी प्रभा. तिच्यासाठी जिथे भावाने पत्रिका टाकली होती (दादरला) त्या मुलाचे आई वडील त्यावेळी घरात नव्हते. त्यांच्या बहीणीने सांगितले मंगळ आहे मुलाला. उद्या या. मुलीची पत्रिका मंगळी नाही पण लहान बहीणीला मंगळ आहे. तेव्हा मोठ्या बहीणीला विचारून त्याने निर्णय घेतला की उद्या मंगळी पत्रिकाच द्यायची. वडील बहीणीच्या लग्नाचे बघत नाहीत म्हणून माझ्याहून लहान भावाने मुंबईला नौकरी धरली. बोरिवलीत घर घेतले भाडयाने. बहीणीची लग्न झाल्याशिवाय मी लग्न करणार नाही असा निश्चय केलेला होता. आश्चर्य सुधाची पत्रिका जुळली. मुलगी पहिल्याच वेळी जिथे दाखवली तिथे पंसत पडली. लग्नाच्या सगळ्या गोष्टी वडीलाना व मोठया मेव्हण्यांना सागून त्या दोघाना मुलाकडे बोलणे करायला नेले. हुंडा जास्त म्हणून वडील उठून बाहेर आले. मेव्हणे पण नाराज. भाऊ म्हणाला मी लहान तोंडी मोठा घांस घेतेय कर्ज काढून सुध्दां मी हें लग्न जुळवणार व पार पाडणार. मुली साठी कुठे जोडे झिजवावे लागले नाहींत कुणाला विचारायची गरज पडली नाही. कुणाशीही सल्ला मसलत नाहीं. हे लग्न होणारच. वडील आधीच नाराज. ते व मेव्हणे निघून गेले. भावानें लग्न ठरविले नंतर मला सविस्तर पत्र पाटवून तूं लग्नाला येच असं आमंत्रण होतंच. पत्र वाचून माझी चिंता दूर झाली. एका बहिणीच्या ऋणातून तो मुक्त झाला. माझ्याकडे असलेल्या बहीणीला (पुष्पाला) मी लग्नाला पाठविलें. मी मात्र गेले नाही कारण दोन नंबरच्या मुलीचे  पायाचे ऑपरेशन त्याच दिवशी होते. भावानें नंतर पुष्पाला कॉलेजला घातले. त्याच्या पाठची माझी बहीण प्रभा आधीच बीए झाली होती व सेक्रेटरीएट मध्यें नौकरी करत होती. तिनें भावाला सांगितले होते जिचे लग्न जमते ते तिचे करून टाक. माझ्या साठी त्यांची वये वाढवूं नकोस. मी कुणावरही बोजा नाही. पैसे मिळविते शिक्षण आहे शिवण येते वगैरे. त्यानंतर धाकट्या बहिणीनें लव्हमॅरेज केले. अर्थात भावाच्या व वडीलची संमति होतीच. मोठी बहीण प्रभा पुन्हां भावाच्या मदतीला धांवली. तू आता लग्न कर तुला सांगून येताहेत. जी मुलगी पसंत पडेल तिच्याशी संसार कर आणि तो बोहल्यावर चढला. बरोबर त्याच्या लग्नाच्या आठव्या दिवशी प्रभाच्या (मुलगा पहाण्याचा) साठी स्थळ आले योगायोग मुलानें मुलगी पाहिली. लग्न ठरले झट मंगणी पट ब्याह अशीच अवस्था झाली.

मुलगी पहाण्यापासुन लग्न होई पर्यंत ६ ते ७ दिवस लागले. त्यावेळी मी दरभंग्याला होते. पत्र पोचायलाच ५, ६ दिवस लागायचे. म्हणून भावाने मला कांहींच कळविले नाही. मुलांना सुटी लागली की मुंबईला जात असें. मी गेल्यावर त्यानें मला ही सर्व माहिती दिली भावाचे लग्न झाल्यापासून लगेच तिच्यासाठीं चांगल्या स्थळांची माहिती मिळायला लागली त्यानें आधी तिचे लग्न उरकले व आपल्या ऋणातून पार पडला.

----------------------------------------------------------------------------

जबलपूर सोडून आम्ही दरभंग्याला आलो. मुले हुषार असल्याने.१४ व्या वर्षीच मॉट्रिक झाली. दोन्ही मुलींनां स्कॉलरशिप मिळाली मुलाला मात्र वडिलांचा पगार जास्त म्हणून १०० रू व उत्तम रीतिने पास झाल्याच सर्टिफिकेट मिळाले. दरभंग्याला गेल्यावर हयानी फुकटांत ज्योतिष पहाण्यास सुरवात केली पीएचडी जे विधार्थी आले त्यांच्या बरोबर ज्योतिषाचा अभ्यास केला. तसा अभ्यास आधी पासून होताच तो आता शास्त्रशुध्द होऊ लागला त्यांचे दोन तीन विधार्थी नेपाळमध्ये जाऊन भविष्य वर्तवू लागले. बिहार व नेपाळ हयांच्या सीमा एकदुस-याला लागून. दरभंग्यालहून रक्सोलला व तिथून नेपाळला ताबडतोब जाता येई. पटणा कांठमांडू विमानसेवा होती. हयानी ५८ वर्ष पूर्ण झाल्यावर रिटायरमेंट घेतली अगदी कमी पेन्शन होती कारण १५ वर्षेच सर्व्हिस झालेली. पण पुढे कायदा बदलत जाऊन पेन्शन चांगली मिळायला लागली.

----------------------------------------------------------------------

सोवळे ओवळे

माझ्या आईचे सोवळे ओवळे फार असायचे तिचे जसजसे वय वाढत गेले त्याप्रमाणे सोळयांत वाढच झाली. आम्हाला त्याचा त्रास व्हायचा. प्रत्येक वेळी हात धुवूनच कोणत्याही वस्तुला हात लावायचा. जर कारण विचारले तर डोक्यांत खाजवता, कांनात तोडांत कुठेही हात असतो, म्हणून हात धुणे आले. तेव्हा खूप राग यायचा. आता स्वच्छतेच्या दृष्टिने ते योग्यच वाटते. फळीवरची भांडी धुवून घेणे. ताटे वाटया ओल्या फडक्यानी पुसणे हे त्यावेळी खूपच कटकटीचे काम वाटे. पण आम्ही आमच्या वेळी हेच केले कदाचित मुलाना नातवाना ही कटकटच वाटत असेल. पाळीच्या दिवसात तीन दिवस दूर बसणे हे पण आलेच त्याचे सामाजिक कारण तीन दिवस बायकानी कोणते ही काम करायचे नसे. कोरडे धान्य गहू ज्वारी वगैरे निवडणे हे काम असे. पण आमच्या घरी हया कामाला (तेलीण) बाई होती ती सर्व करायची. सोवळे म्हणजे स्वच्छता हा अर्थ घेतला तर आई बरोबर व आम्ही चूक. पण सणवार देवाची पूजा समई दिवे रोज समोरच्या देवळात तेल देणे हे वडीलांना आवडत नसे पण आई ते सर्व गडयाकडुन किंवा आम्हा मुलांकडून करवायची. आम्ही सात भांवडे होतो. पण मोठ्या मुलाने सकाळचा चहा, ताक घुसळणे, गडयानी घासलेली भांडी (सोळयांत) धूवून आंत आणणे आल्या गेल्याचा चहा ही सर्व कामे त्यानेंच करायची. पहिल्यांदा माझा आतेभाऊ शिकायला होता तो हे सर्व करी. तो आमच्या कडून आमचा छळ करून कसा गेला ती स्वतंत्र कहाणी आहे. मोठा भाऊ मॅट्रिक होई पर्यंत त्यानंतर ताई लग्ना पर्यंत (नंतर ती मुबईला गेली ) नंतर मी, माझ्यानंतर माझा भाऊ अशी परंपरा चालूच ठेवली, मोडली नाही.

मला चहा करता येईल की नाही असे आई विचारायची. शेवटची बहीण जेव्हा मुंबईला गेली तेव्हा त्यानंतर आईला म्हशीचे दूध सुध्दा काढायची. जेवणात उत्तमोत्तम प्रकार असायचे. लोणची तर खूप त-हेची आई करायची. आंबा लिंबू मिरची भोकर हयांचे तर लोणचे असायचे पण पिक्क्या आंब्याचे फेसून मोहरीचे केलेलो लोणचे देखील. असे एक आंबा घेऊन भात व खार खाल्ला की मस्त जेवण होत असे. पाव्हणे भरपूर असत. वडील वकील असल्यामुळे वडलांचे भाऊ आईचे वडील गांवाकडचे लोक जेवायला असायचे. कित्येक वेळा अगदी कोर्टाच्या वेळी साक्षीदार म्हणून काका यायचे व आम्ही आमची वाढलेली ताटे त्यानां द्यायची व शाळेंत जायचे. मधल्या सुट्टीत आई सर्व ठेवायची व थांबायची पण जेवणासाठी. ती सवय मला अजुनही आहे. मुलांसाठी, हयांच्यासाठी, जेवायला थांबायचे. जेवून घे असे हे म्हणत. मुलेही म्हणत, पण कधीही जेवले नाही. जेवावे असे वाटतही नसे.

नारळाची चटणी पोहे (कांदा घालून) व ओले पावटे दुधाच्या दशम्या पंचामृत हया गोष्टी नेहेमी असायच्या. कडवे-पावटे भिजत घातले की भरपूर लागत. पण सर्वानी थोडे थोडे सोलायचे कंपलसरी. तीच सवय मला होती. दरभंग्याला आम्ही सर्वजण मटार सोलायला बसायचो. गोड गोड म्हणून बरेच मटार कच्चे खायचो. श्रीखंड पुरी बासुंदी हेच प्रकार सणावारीं असत. कारण घरची म्हैस बासुंदीही बाहेरुन आणायची पध्दत नव्हतीच. व बाहेर काही मिळायचें नाही. देवरुखला तर माझ्या लहानपणी एकपण

खाणावळ नव्हती. सर्व कांहीं घरीच करायचे. त्यामुळे पुण्याला सुध्दां सर्व खाण्याच्या गोष्टी मिळत असताना पण बाजारचे आवडायचे नाही. दहीवडे सामोसे रसगुल्ले शिरा साखरभात सर्व पदार्थ घरीच. शिरा, साखरभात गाजराचा हलवा करण्यांत हे पटाईत होते. ह्यांची आई लौकर म्हणजे वयाच्या १२ व्या वर्षी वारली होती. एकुलत्या एका मुलाला सावत्र

आईचा त्रास नको म्हणून सास-यानी दुसरें लग्न केले नाही. त्यांचे वय फार नव्हते. त्या काळी लहानपणीच मुलीची लग्न होत. माझ्या मोठया नणंदेचे लग्न झालेले होते. दुसरी घरी होती व तिसरी तान्ही म्हणून तिच्या आतेने तिला आपल्याकडे नेले. तिथेच ती लहानाची मोठी झाली. मुलांच्या शिक्षणासाटी घरचे वातावरण तसेच लागते. माझ्या वडीलांचे लग्न झालें त्यावेळी त्यांचे वय १२ वर्षे व आईचे वय आठ वर्षे. पण पुढे माझे वडील बीए, एलएलबी झाले त्यामुळे आई सुध्दां ३री पर्यत शिकली. माझ्या सासूबाई पण त्यावेळी ७वी पास होत्या कारण ह्यांचे वडील हेडमास्तर होते. माझ्या सगळ्यांत लहान नणंदेल तिच्या आत्याने नेले व सास-यांच्य डोक्यावरची एक जबाबदारी कमी झाली, पण शिक्षणाचे वातावरण त्या घरांत नव्हतेच. मिक्षुकी होती. त्यामुळे माझी नणंद ७ वी पण पास होऊ शकली नाही. मी त्यांच्याहून ४-५ वार्षानी लहान, पण मी मट्रिक झालें होते. मुबईल रेशन दुकानातून मॅट्रिकच्या मुला मुलींना पटापट नोक-या मिळत होत्या. १९४६ चा काळ होता तो. युध्द १९४५ लाच समाप्त झालेले होते. मुलगी मुंबईला गेली तर नोकरी करील म्हणून वडीलानी मला मुंबईला पाठविलेंच नाही. मुलीने नोकरी केलेले वडीलांना आवडत नसे. सास-यानी उताम आचारी टेवला. त्याच्याकडे सर्व शिकले. व मग सासरे स्वतः स्वयपाक करु लागले. हे मदतीला असतच. सास-यांच्या भावजयीचे भाऊ प्रसिध्द डॉक्टर होते. त्यानी नानांना (सास-यांना) पत्र पाठविले की माणूस आपल्या जुन्या चपलेवर जितके प्रम करतो तेवढे सुद्धां दुस-याच्या मुलावर करत नाही. त्याचा सरळ अर्थ माझी बहीण  तुमचे (दिराचें) कांहीच करणार नाही. म्हणूनच त्यांनी आचारी ठेवून स्वयंपाकाचे शिक्षण घेतले. स्वयंपाकात काय शिकायचे असे मनात येते. पण पाकसिध्दि म्हणजे काय हे करुन पहावे लागते. मराठींत एक म्हण आहे घर पहावे बांधून व लग्न पहावे करून. मी तर म्हणेन स्वयंपाक करावा बघून. मग समजेल कच्चे पक्के. ह्यापासून. उतम चव हा स्वयंपाकाचा गुण आहे. शिवाय मागचा पसारा, मिरचीच्या, कोथिंबिरीच्या, काड्या दाण्यांची टरफले वगैरे सर्व गोष्टी आवरून स्वयंपाकघर स्वच्छ करणे ही एक कलाच आहे. पण तिच्या तंत्राची जाण झाली नाही तर ती कंटाळवाणी होते.

प्रिय आईस,

दादा गेले नी तुला खूपच एकटे वाटायला लागले हे मला माहित आहे. पण काय करणार? आम्ही मुले नोकरीच्या ठिकाणी रजा किती घेणार? मुलगा सून नातू हे सर्व आपापल्या व्यवसायात. म्हणून तुझ्या साठी मी वृध्दाश्रमाचा मार्ग ठरविला आहे, त्याच्या साठी हा पत्र प्रपंच. तू हे पत्र वाचून आपला अभिप्राय मला दे वृध्दाश्रमाबद्दलची माझी मते तुला माहितच आहेत. पण प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतात. मी दुस-या बाजूचा विचार करून हया निर्णयाप्रत आले की वृध्दाश्रम हा तुझ्यासाठी उत्तम पर्याय आहे कारण

१) समवयस्क लोक, तुझ्याच वयाच्या बायका

२) ज्यांना खेळांची आवड आहे (तुझ्यासारखी) पत्ते कॅरम बुध्दीबळे वगैरे बैठे खेळ

३) फिरायला जाणे (समवयस्कां बरोबर )

४) सुरक्षितता, घरात तुला एकटीला ठेवून जाणे धोक्याचे वाटते पैसेवाली वृध्दा एकटी आहे असे पाहून कोणीही घरात घुसेल. प्लंबर, विजदुरूस्ती वाला, फोन वाला वगैरे.

५) वृध्दा स्त्रिया व म्हातारपणाच्या गोष्टी जुळतील. सांधेदुखी, कमरदुखी, चालता न येणे हयावर डॉ ची व्यवस्था आश्रम करणार. तुझ्या वेळ चांगला जावा असे वाटते म्हणून हा सगळा घाट आहे. मी ३- ४ वृध्दाश्रम पाहिले आहेत. तुला वाटले तर एखादा पदार्थ सगळयांसाठी करणे कधी सर्वासाठी फळे आणणे संत्री मोसंबी चिकू वगैरे, सगळयांचे नाहीत पण आवडणा-या लोकांचे वाढदिवस साजरे करणे, हयांत तुझा वेळ छान जाईल. आता तू मुक्त आहेस. कुणाच ही बंधन नाही. स्वतंत्र विचार करू शकतेस. कुणीही अडवणार नाही. विचारापासून परावृत्त करणार नाही. त्यामुळी तुझा लौकर निर्णय कळव म्हणजे मला तशी व्यवस्था करता येईल

--- तुझी कन्या ---

ज्योतिष

१९४९ मध्ये फेब्रुवारीत आमचे लग्न झाले त्यावेळी फक्त हे ज्योतिष बघत एवढेंच ठाऊक होते. माझ्या मेव्हण्यानी हयांना एक पत्रिका दिली. पत्रिका त्यांच्या बहिणीची होती हे मात्र सांगितले नाही. पत्रिका जुळली तर लग्न ठरवू असे म्हणाले. माझी व ही पत्रिका जुळत नाही असे हे म्हणाले व तो विषय तिथेच संपला. नंतर आमचे लग्न ठरले व झाले. मी मात्र पत्रिकेचा विषय काढलाच व पत्रिका का जुळत नाही म्हणून विचारणा केली. मुलीच्या पत्रिकेत वैधव्य आहे, तेव्हा पहिला बळी मीच हे मला पटले नाही म्हणून नाकारली मुलगी. काय आश्चर्य. बहीणीच्या नणंदेच लग्न झाल माझ्या आधी व लगेच महिन्या भरांत तिला वैधव्य आले. तिचे यजमान तापाचे निमित्त होऊन गेले. त्यांचे भविष्य ऐकून मी मात्र अस्वस्थ झाले, ताईला सांगितले नाही पण आई वडीलांना मात्र सांगितले. मला हे ज्योतिष सांगतात हे माहित होत. पण मी मात्र ऐकायला बसत नसे. कारण प्रत्येकाचे प्रायव्हेट आयुष्य फक्त ज्योतिषी, डॉक्टर यांनाच सांगतो असे माझे मत. त्यांची

भाकिते बरोबर निघतात हे मला कुणी सांगितले? ज्यांचे भविष्य असे तेच अधून मधून सांगायचे. दुसरे भविष्य पुण्याचे. आमच्या शेजारी सोसायटीत एक गृहस्थ रहात. त्यांच्या मुलाच्या लग्नाबद्दल त्यानी व त्यांच्या बायकोने विचारले. तुमच्या मुलाचे लग्न ठरविक दिवशी होईल. मुलाला मुंबईला नोकरी मिळेल असे हे म्हणाले. मुलगी चांगली उंच गोरी अशी असेल शिवाय ती पुण्यातली असून आईवडीलांची लाडकी असेल. तिला एक भाऊ व एक बहीण असेल. असे सर्व काही सांगितले हे सर्व मला त्या बाईनी सांगितले व त्याप्रमाणेच झाले.

(आजचा विचार )

योगा योग

१) जन्म २ जानेवारी
२) दोघेही (नवरा बायको ) पोस्ट गॅज्युएट -- सतीश फिजिक्स व अनिता एकॉनॉमिक्स घेऊन.
३) दोघे ही आय ए एस
४) दोघांना गव्हमेंट सर्व्हिस ओरिसांत
५) मुले दोन -- एक मुलगा एक मुलगी
६) सतीशला बहीणी दोनच
७) अनिताला भाऊ दोनच
८) घरांत दोन फ्रीज
९) घरांत दोन टी व्ही
१२) मोठया बहीणीला दोनच मुलगे
१३) छोटया बहीणीला दोनच मुले मुलगी मुलगा

असं खूपच साम्य. दोघांच लव्ह मॅरेज. मुलगा लग्न ठरवून आला. सून बंगाली, आम्ही महाराष्ट्रीयन, कसे पटणार असे वाटले. मोठया मुलीला बंगाली येत होते. जावई तर कलकत्याला रहात होते म्हणून बंगाली छानच येत असे. आणि दोनाचा चमत्कार बघून मला हंसू येते. सांगायची गोष्ट म्हणजे मला पण दोनच नाती १ मुलीची मुलगी (प्राची) व दुसरी मुलाची मुलगी (सृष्टि). म्हणायला मात्र आम्ही अद्वैती पण प्रत्यक्षांत द्वैतीच. भारताचे दोन दिवस १५ ऑगस्ट व २६ जानेवारी दोन्ही राष्ट्रीय सण (पुन्हा दोनच ) भाषा इंग्लिश व हिंदी (दोन). राष्ट्रगीताचा वाद -- वंदे मातरम की जनमन गण असा भारताबाबतही दोनाचा प्रभाव.

## सासरे

माझे सासरे आता नाहीत पण मला अजूनही हे पटत नाही. ते अमरच आहेत असे सारखे वाटते. इतके विद्वान्, इतके समंजस, न रागावणारे. ह्यानां मृत्यू कसा काय नेईल? शक्य नाही, असे वाटे. मी बंगाली म्हणून माझ्याशी बंगाली बोलतो म्हणत इंग्लिश मध्येच बोलायचे. त्याना खूप वाटे बंगला बोलावेसे, पण उच्चार उमटत नसे. त्यामुळे इंग्लिशच बोलायची भाषा झाली होती. डबल एमए पीएचडी (फिलॉसफी संस्कृत) असल्यामुळे इंग्लिशची अडचण नव्हतीच आणि मी तर एसएससी बोर्डात ३ लाख विद्यार्थ्यांत पहिली आलेली. शिवाय एमए आणि आयएएस. माझे इंग्रजी उत्तमच होते. त्यांचे मला मार्गदर्शन सर्वच विषयांत होई. पैशाच्या बाबतीत तर नेहमीच. मुलांच्या शिक्षणांत नातवाला स्वतः घरी ठेवून होस्टेलला नाही ठेवायच अस सांगून त्याला बीई केले. दुस-या नातवाला (मुलीचा मुलगा) त्याला पण घरी ठेवून बीई केले. मला वाटत ते जाताना समाधानाने गेले. फक्त माझी मुलगी सृष्टी - तिच शिक्षण राहिले असे त्याना वाटले. अर्थात् ती सीबीएसई ची १० वी पास त्यांच्या देखत झाली. मुलाने व सुनेने (नातीसह) आपल्याकडे रहावे असे त्यांना वाटे. पण ते आमच्या नोकरीमुळे शक्य नव्हते. म्हणून ते मात्र आमच्याकडे भुवनेश्वरला येणार होते. माझा मुलगा बीई नंतर पुढील शिक्षणासाठी अमेरिकेला गेला. आबू आणि मॉमला आपल्याकडेच घेऊन ये असे मला सांगून गेला. पण प्राक्तन. नशीबाची भाषा कुणाला कळलेली नाहीच. मला एक महाभारतांतील कहाणी आठवली. धर्मराजाकडे एक याचक आला. आता तू उद्या ये असे सांगून धर्मराजा महालांत जाण्यास वळले तेव्हा भीम तिथेच होता. तो म्हणाला हे यमपुत्र ना ह्यांना यमराजाने सांगितलेले दिसले की हा याचक उद्यापर्यंत जिवंत राहील.

तू उद्या ये असे सांगून धर्मराजा महालांत जाण्यास वळले तेव्हा भीम तिथेच होता. तो म्हणाला हे यमपुत्र ना, हयांना यमराजाने सांगितलेले दिसले की हा उद्या पर्यंत जिवंत राहील. मग धर्मराजाला आपली चूक कळून त्याने याचकाचे काम लगेच करून टाकले.

आबू देखील लौकर भुवनेश्वरला येऊन राहिले असते तर त्यांना मुलाचा सहवास मिळाला असता.

---

आबूंना (सास-यांना) बरे वाटत नाही म्हणून सतिश फोन आल्या बरोबर पुण्याला गेला. असेंब्ली चालू होती. चार दिवसांनी

त्याला वाटले की भुवनेश्वरला जलद फेरी करून ऑफिसची महत्वाची कामे संपवावी. स ने मी आता भुवनेश्वरला परत जातो महिन्याची रजा काढून लगेच येतो. मी जाऊना, असे त्यांना विचारून पुणे सोडले. मोठ्या दीदीने आठ दिवसाची रजा टाकली होती. ती तिथेच होती व औषध पाण्यावर स्वतः मी देखरेख करीन असे स ला म्हणाली म्हणून सतिश दुपारी १२ च्या बसने मुंबईला आला व विमानाने कलकता. लगेचच पुण्याला फोन केला की मी सुखरूप पोचलो उद्या सकाळी ६ च्या विमानने भुवनेश्वरला जाईन. माझ्या मते सतिशने निघायलाच नको होते तिथून (पुण्याहून). त्याने फोनवर जरी मुख्य सेक्रेटरीना सांगितले असते व महिन्याची रजा घेतली असती तरी चालले असते. तो सकाळी ६ च्या विमानाने कलकत्याहून भुवनेश्वरला जाणार होता हे नियतीला पटले नसावे. पहाटे ४लाच दीदीचा फोन आला -- आबू झोपेतच गेले तू भुवनेश्वरला न जाता मुंबईला परत ये व तिथून पुण्याला. मी इथून फोनवर सर्वाना कळविते. त्याने लगेच कलकत्ता मुंबई विमान पकडले मुंबईहून वोलवो बसने तो पुण्याला आला. भाचे व जावयाच्या मदतीने मॉमने सर्व तयारी केली होती छोटी दीदी जी डॉक्टर (एमबीबीएस) आहे, ती व तिचे यजमान दोघे आले ३ वाजतां दुपारी. मग पार्थिव उचलले. मी व सृष्टि मात्र त्या दिवशी पोचूच शकलो नाही. आम्हांला अंत्यदर्शन मिळाले नाही. पुढील सर्व विधि नाशिकलाच पार पाडले व उदकशांत मात्र पुण्याला १३व्या दिवशी केली. कारण शिवरात्र व दुस-या दिवशी अमावास्या होती. मी मात्र सृष्टिची ११ वीची वार्षिक परिक्षा असल्यामुळे शनिवारीच परतले सृष्टि मात्र सबंध प्रवासात व नंतरही येताना व जाताना अजिबात बोलली नाही. तिने खूपच हाय खाल्ली होती.

---------------------------------------------------------------------------

(आजोबा) आबू

१३ फेब्रुवारीला पहाटे ४ वाजता फोन वाजले. आईला बाबांचा फोन होता. अचानक फोन आल्यामुळे मी जागी झाले होते. मी आईजवळच झोपले होते. मोठा आघात झाला होता. आमचे आबू आम्हाला सोडून गेले होते. बाबा भुवनेश्वरला न येता मुंबईला परतले होते. मी अगदी सुन्न होऊन गेले. आईचे सांत्वन करू की माझे दुःख तिला सांगू. मला काहीच समजेना. आबूंच्यासाठीचे माझे सगळे मनोरथ कोसळून पडले होते. मी सगळयां नातवंडात लहान होते. माझे खूप लाड करायचे. गोष्टी सांगायचे महाभारत रामायण हयांच्यातल्या. फिरायला न्यायचे मंदिरात मला घेऊन जायचे. आता आबू आले की तो पर्यंत माझी परीक्षा संपलेली असेल असे वाटले. तेव्हा जगन्नाथपुरी, नंदनकानन वगैरे त्यांना घेऊन गाडीतून फिरून येऊ. रोज त्यांना घेऊन राममंदिरात जाईन फॉरेस्ट पार्कमध्यें जाईन असे बेत केले होते. लिंगराज मंदिरात पण जायचे होते. सगळे मनांतले मांडे मनातच राहिले. आबू गेले असे कळले तेव्हा तर माझी बोलतीच बंद झाली. पुण्याला जाऊन आबूंचा सर्व वृतान्त ऐकेपर्यंत मी एक अक्षर सुध्दा बोलले नाही. विमानांत सुध्दा डोळे गळतच होते. आम्ही पोचलो तेव्हा आबूंचे पार्थिव नेलेले होते व मुंबईचे नातेवाईक मुंबईला परत गेले होते. नाशिकचे विधी उरकल्यावर परीक्षा असल्यामुळे मी व आई लगेचच भुवनेश्वरला आलो. दुस-या दिवशी शिवरात्र व नंतर अमावास्या असल्यामुळे उदकशांत करून नंतर बाबा (आजीला) मॉमला घेऊन भुवनेश्वरला आले. अर्थात् विमानाने. आजी सिनिअर सिटिझन आहे शिवाय भाडी पण विमान कंपन्यानी कमी केली आहेत. मी अभ्यासाला लागले आहे. परीक्षा जवळ आली आहे होय ना. आता १२ वीचे वर्ष संपेपर्यंत (आजी) मॉम आमच्या कडेच रहाणार.

---------------------------------------------------------------

आज अमावास्या सूर्यग्रहण अर्थात् भारतात (महाराष्ट्रांत) २।३ ठिकाणीच दिसणार. पण हयांच्या स्मृति आजही कायम आहेत काळ हे मोठे औषध आहेच. माझी मोठी मुलगी लीना त्यावेळी (एम,एस्सी,) फिजिक्स झाली फर्स्टक्लास मधे. तिची मैत्रीण त्याच वेळी एमबीबीएस पास झाली. आनंदाची बातमी सांगायला ती आली. हयांनी पटकन पेढे आणवले तिला पेढे दिले म्हणाले. वा छान. तू आता डॉक्टर झालीस. डॉक्टरीण बाई आम्हाला तपासा फी सांगा. ती म्हणाली की का लीना पण एमएस्सी झाली की? तिचे कौतुक नाही पण तू डॉक्टर झालीस तू तुझा स्वतंत्र धंदा सुरू करू शकतेस लीनाचे तस कुठे आहे? तिला बरे वाटले. त्यानंतर मी हयांना म्हटले वीणाचे कौतुक केलेत पण स्वतःच्या मुलीला कमी लेखलेत. म्हणाले अग तिला वडील नाहीत कुणीतरी मोठ्या माणसानी कौतुक केले की आंनद वाढतो पटले मला. तीन वर्षानी माझी दुसरी मुलगी डॉक्टर (एमबीबीएस) झाली व तिची मैत्रीण कुमकुम (एम,ए,) झाली तेव्हा हयानी कुमकुमचे तोंड भरून कोतुक केले गुलाबजाम आणले तिच्या साठी. म्हणाले की एक मुलगी एम, ए, झाली मास्टर ड्रीग्री, मिळवली माझी मुलगी डॉक्टर झाली पण ग्रॅज्युएटच ना मास्टर ड्रिग्री कुठे? मी चाट. लीनाच्या वेळी वीणाची स्तुती छायाच्या वेळी कुमकुमची स्तुती. कुमकुम खालच्या वर्गातील तिला पण वडील नाहीत तिच्या भावाने तिचे शिक्षण केले म्हणून अपूर्वाई नाही का? मी मात्र दिङ्मूढ झाले. हे विचार केल्यावर पटले. दुस-याचे चांगले गुण हुडकून त्याची स्तुती करणे हाच हयांचा मोठेपणा. शिवाय त्यांच्या घरीं त्या मुलीची स्तुति कोण करणार? कोणी शिकलेलें मोठे माणूस नाही मुख्यतः वडील. त्या दोघीनांही वडील नाहींत.

---------------------------------------------------------------------------------------

आम्ही जबलपूर सोडून दरभंग्याला जायच नक्की झाले जबलपूरच्या (कायमच्या) नोकरीचे जे कांही सोपस्कार होते ते पार पाडले. आम्ही वाराणसीला जाऊन मीटर गेजने दरभंग्याल जावे लागणार होते. मला दिवस होते म्हणून माझ्या मैत्रीणीला बरोबर घेतले. तिचा वर्षाचा मुलगा पण बरोबर होताच. वाराणसीला गाडींत बसलो मी रात्रीच्या वेळी जागले व आतां तुम्ही लक्ष ठेवा सामानावर असें ह्यांना सांगून मी झोपले. उठल्यावर बघतें तो काय हे झोपलेले मैत्रीण पण झोपली होती. सर्व सामान ठीक आहे ना हे पहिले तो काय? मुलांची पादत्राणें नाहीशी झालेली फराळाचा डबा-- शेजारघरी लग्न झाले म्हणून त्यांनी टिफिनच्या डब्यातच लाडू शेव चिवडा वगैरे दिलें होतें ते गेलं. आम्ही लग्नाला हजर नव्हतो म्हणून डबा. मी म्हटले चला सुरवात तर चोरीनें झाली आतां दरभंग्याला पोचेपर्यंत काय होते ते बघूया. मधल्या एका स्टेशनवर चहा घ्यायसाठी मी व मैत्रीण खाली उतरले. हे पाणी आणायला गेले नी गाडी सुरु झाली. छायाने (दोन नंबरच्या मुलीने) भोकाडच पसरले दादा खालीच राहिले म्हणून. मी तिची समजूत घातली अग ते कुठल्यातरी डब्यांत शिरले असतील तेव्हां ती रडायची थांबली. इतर पॅसेंजर कौतुक करत होते की वडीलांवर किती माया पोरीची. दुस-या स्टेशनवर गाडी थांबली व हे आमच्या डब्यांत आले तेव्हां तिचा आनंद अवर्णनीयच होता. दरभंग्याला तेव्हां मीटर गेज होता आतां ब्रॉडगेज झाला आहे. ह्यांचा एक विद्यार्थी स्टेशनवर हजर होता. सायकलरिक्षा म्हणून मुले नाखूष. पण इलाज नव्हता दोन रिक्षा करुन घरी पोचलो आणि बिहारचे रहिवासी झालो. बिहारमध्यें तब्बल १६ वर्षे राहिलो. मुलांचे शिक्षण उत्तम रीतिने पार पडले. मोठी मुलगी लीना बीएस्सी झाली व एमएस्सी फिजिक्स साठी पाटण्याला बोर्डिग मध्यें गेली. तिथेच राहून आयएएस चे क्लासेस करुन आयएएस झाली व भारतीय प्रशासन सेवेत रुजूं झाली. दुसरी मुलगी होस्टेल मध्यें राहून एमबीबीएस डॉक्टर झाली व मुलगा बीएस्सी पर्यत दरभंगा येथेच शिकला. कांही दिवस मुझफ्फपूररच्या होस्टेल मध्यें एमएस्सी साठी राहिला व नंतर मुंबईला जाऊन आयआयटी होस्टेल ला राहून फिजीक्स मध्यें एमएस्सी झाला. तोपण आयएएस झाला १९८० मध्ये. भारतीय प्रशासन सेवेत आहे. बिहारमध्ये राहून सुध्दां मुलांना उच्च शिक्षण घेतां आले. ह्यांनी मुलाला कधी एक चापट ही मारलेली नाही. पण एका दिवशी मात्र ह्यांची पांचही बोट स च्या गालावर उमटली. मुलगा पण पक्का. हूं की चूं केले नाही. मी अवाक् झाले. मारण्याचे कारण काय तर आमचा शिंपी होता मुसलमान. पण ह्यांच्याबद्दल त्याला खूप आदर होता. तो ह्यांना म्हणाला -- काल तुमचा मुलगा त्या सरदारजीच्या मुलाबरोबर माझ्या दुकानांत आला होता. सरदारजीचा मुलगा कांही बोलला तरी त्याच्या कडे कोणी लक्ष देत नसे. तेंव्हा सतिशच वय ५ वर्षाचें असेल तो शिंप्याला म्हणाला -- हमारा कपडा कल नही लाया तो आपको छठी का दूध याद दिलायेंगे. शिंप्याला खूप वाईट वाटले. बिहार मध्ये लहान मुलांना बबुआ म्हणतात. मला ते लोक बहुजी म्हणत.एका सदाचारी प्राध्यापकाच्या (प्रोफेसर) मुलाने हे शब्द वापरावे हे त्याला योग्य वाटलें नाही. सरदारजीच्या मुलाची संगत सोडा. मी तुम्हाला मुलाला मारायला सांगितलें नाही. मला त्याच्या बोलण्याचें खूप वाईट वाटले - म्हणून सांगितलें. एका प्रध्यापकाच्या मुलानें चांगलें बोलावें - चांगले वागावे अशी सामान्य माणसांची सुद्धा इच्छा. त्यानंतर मात्र सतीश मोठ्यांचा आदर करायला शिकला. आम्ही मुलांच्यावर उत्त-संस्कार व्हावे म्हणून जपत होतोच. महाराष्ट्रांतून त्यावेळीं लोकसत्ता घेत होतों. एकदोन दिवस उशीरां वर्तमानपत्र मिळत असे - पण मुलांना मराठी माणसाचे आचार विचार संस्कृति रामायण महाभारत - सगळयाची ओळख व्हावी हया साठीं किर्लोस्कर मासिक, स्त्री मासिक, वसंत, हंस वगैरे दिवाळी अंक मी आवर्जून मागवत असे. त्यामुळेच त्याना चांगले विचार, चांगले आचरण, चांगले विषय हयांची जाण होत चालली होती. मुलानां कुणी ही वाईट म्हणूं नये हीच इच्छा होती. तसं दरभंगा आम्हाला पसंत होतंच. धरणगांवला मुलांच्या सुटीत जाणे- येणं चालूंच ठेवलं होतं. घराची डागडूजी, स्वच्छतां याकडे त्यामुळे लक्ष होतंच. मुंबईला पण माझी मुलें व मी माझ्या बहीणींकडे जात होतों. माझ्या चारही बहिणी मुबईलाच होत्या. मी व माझा मोठा भाऊ मात्र मुबईच्या बाहेर होतों. मुंबईचें त्यावेळीही खूपच आकर्षण असे.